**ठळक बातम्या**

- पाच राज्यांच्या विधानसभा निवडणुकांचा कार्यक्रम जाहीर, पश्चिम बंगालमधे दोन टप्प्यात मतदान
- बारामती आणि राहुरी विधानसभा मतदारसंघांमधल्या पोटनिवडणुकासाठी २३ एप्रिलला मतदान, ४ मे रोजी सर्व निवडणुकांची मतमोजणी
- एलपीजी गॅस वितरकांकडे गॅसचा अखंडित पुरवठा, गेल्या दोन दिवसांत गॅस नोंदणीत घट झाल्याची पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालयाची माहिती

**आणि**

- बीसीसीआय नमन पुरस्कार प्रदान सोहळा नवी दिल्लीत सुरु, एकदिवसीय विश्वचषक स्पर्धा जिंकणाऱ्या महिला संघाचा गौरव, देशांतर्गत स्पर्धांमधल्या सर्वोत्कृष्ट खेळाडूचा पुरस्कार आयुष म्हात्रे आणि इरा जाधव यांना प्रदान

**<><><><><>**

पाच राज्यांच्या विधानसभा निवडणुकांचा कार्यक्रम आज नवी दिल्लीत मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी निवडणुकांचं वेळापत्रक जाहीर केला. आसाम, केरळम, पुद्दुचेरीमध्ये ९ एप्रिलला, तर तामिळनाडूमध्ये २३ एप्रिलला मतदान होणार आहे. तर पश्चिम बंगालमध्ये दोन टप्प्यात मतदान होणार आहे. पहिल्या टप्प्याचं मतदान २३ एप्रिल रोजी तर दुसऱ्या टप्प्याचं मतदान २९ एप्रिल रोजी होईल. पश्चिम बंगालमध्ये आधी आठ टप्प्यात मतदान प्रस्तावित होतं, मात्र ते दोन टप्प्यापर्यंत घटवण्यात आल्याचं ज्ञानेश कुमार यांनी सांगितलं..

**होल्ड.. बाईट - ज्ञानेश कुमार**

महाराष्ट्र, गोवा, कर्नाटक, गुजरात, नागालँड आणि त्रिपुरामधल्या ८ विधानसभा मतदारसंघांसाठी पोटनिवडणुकीची घोषणाही ज्ञानेश कुमार यांनी केली. राहुरी

मतदारसंघातले आमदार शिवाजी कर्डिले, आणि बारामती मतदारसंघाचे आमदार माजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनामुळे या जागा रिक्त आहेत. या दोन्ही मतदारसंघांसाठी २३ एप्रिलला मतदान होईल. सर्व निवडणुकांची मतमोजणी ४ मे रोजी होणार आहे. संबंधित राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये आचारसंहिता तत्काळ प्रभावानं लागू झाली आहे.

**<><><><><>**

मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्यावर महाभियोग चालवण्याच्या मागणीला समाजवादी पक्षाचा पाठिंबा असल्याचं पक्षाचे अध्यक्ष खासदार अखिलेश यादव यांनी सांगितलं. ते आज मुंबईत वार्ताहरांशी बोलत होते. ज्ञानेश कुमार हे कर्तव्याबाबत प्रामाणिक नसल्याचा आरोप यादव यांनी केला. विरोधी पक्षांच्या खासदारांनी संसदेच्या दोन्ही सभागृहामधे ज्ञानेश कुमार यांच्यावर महाभियोग चालवण्याची मागणी करणारी नोटीस दिली आहे. लोकसभेच्या १३० आणि राज्यसभेच्या ६३ खासदारांनी यावर स्वाक्षरी केली आहे.

ज्ञानेश कुमार हे विरोधी पक्षांसोबत भेदभाव करतात, सत्ताधारी पक्षाला नेहमी झुकतं माप देतात, सखोल पुनरीक्षणाच्या माध्यमातून त्यांनी लाखो लोकांना मतदानापासून वंचित ठेवलं, असे आरोप विरोधी पक्षांनी केले आहेत.

**<><><><><>**

एलपीजी गॅस वितरकांकडे गॅसचा अखंडित पुरवठा सुरू असल्याचं पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालयानं म्हटलं आहे. मागच्या दोन दिवसांत गॅस नोंदणीत घट झाल्याचं मंत्रालयाने सांगितलं. १३ मार्चला ८८ लाख नोंदणी झाली होती, तर काल ७७ लाख नोंदणी झाली. बिहार, दिल्ली, हरियाणा आणि राजस्थानसह अनेक राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशांनी व्यावसायिक सिलिंडरचं वाटप करण्याचे आदेश दिले आहेत. सर्व राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशांमधे आता व्यावसायिक सिलिंडर पुरेशा प्रमाणात उपलब्ध असल्याचं मंत्रालयाने सांगितलं.

पेट्रोल आणि डिझेलचा पुरवठाही सुरळित असल्याचं तेल विपणन कंपन्यांनी कळवलं आहे. देशात पेट्रोल आणि डिझेलचा पुरेसा साठा उपलब्ध असल्याने नागरिकांनी भिती बाळगू नये असं आवाहन पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालयाने केलं आहे.

**<><><><><>**

आसाममधे  २ हजार ९२ कोटींच्या आरोग्य प्रकल्पांचं उद्घाटन आणि पायाभरणी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या हस्ते आज झाली. आसामच्या आरोग्य व्यवस्थेची स्थिती अनेक वर्षं अतिशय वाईट होती, आता आसाममधे वैद्यकीय महाविद्यालयं, रुग्णालयांची निर्मिती झाली आहे,

**होल्ड बाईट शहा**

गुवाहाटी इथल्या  प्रागज्योतिषपूर वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालयाचा यात समावेश आहे. गोलाघाट आणि तिनसुकीया इथल्या दोन कॅन्सर सेंटरचं उद्घाटन शहा यांनी दूरस्थ पद्धतीने केलं. याशिवाय दिफू, जोरहाट आणि बारपेटा इथल्या वैद्यकीय महाविद्यालयांचं उद्घाटन शहा यांनी दूरस्थ पद्धतीनं केलं.

**<><><><><>**

भारतीय क्रिकेट नियामक मंडळ BCCI चा  'नमन पुरस्कार ' सोहळा नवी दिल्लीत सुरू आहे. दिग्गज खेळाडू रॉजर बिन्नी आणि राहुल द्रविड यांना 'कर्नल सी. के. नायडू जीवनगौरव पुरस्कारा'नं, तर भारतीय महिला क्रिकेट संघाची माजी कर्णधार मिताली राज हिला 'BCCI महिला जीवनगौरव पुरस्कारा'ने सन्मानित केलं जाणार आहे. सर्वोत्कृष्ट आंतरराष्ट्रीय खेळाडू म्हणून शुभमन गिल आणि स्मृती मानधना यांचा गौरव करण्यात आला. २०२४-२५ या क्रिकेट हंगामातल्या उत्कृष्ट कामगिरीसाठीचे पुरस्कारही या शानदार सोहळ्यात प्रदान करण्यात येत आहेत. १९ वर्षांखालच्या खेळाडूंसाठीचा विश्वचषक जिंकणाऱ्या महिला तसंच पुरुष संघाचा

गौरव करण्यात आला. २०२५ चॅम्पियन्स करंडक जिंकणाऱ्या संघालाही यावेळी गौरवण्यात आलं. एकदिवसीय विश्वचषक स्पर्धा जिंकणाऱ्या महिला संघाचाही गौरव करण्यात आला. तसंच, देशांतर्गत झालेल्या विविध क्रिकेट स्पर्धांमध्ये चमकदार कामगिरी करणाऱ्या खेळाडूंनाही यावेळी गौरवण्यात आलं.. देशांतर्गत स्पर्धांमधल्या सर्वोत्कृष्ट खेळाडूंचा मान आयुष म्हात्रे आणि इरा जाधव या मुंबईकरांना प्रदान करण्यात आला. देशांतर्गत क्रिकेट स्पर्धांच्या आयोजनासाठीचा पुरस्कार मुंबई क्रिकेट संघटनेला मिळाला.

**<><><><>**

कृत्रिम बुद्धिमत्तेचा शेतीमध्ये वापर करणारं महाराष्ट्र हे देशातलं पहिलं राज्य असून या माध्यमातून शेतीचा उत्पादन खर्च हा २५% कमी झाला आहे, तर उत्पन्न मात्र वाढल्याचं प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी केलं आहे. ते आज राहुरी इथं महात्मा फुले कृषि विद्यापीठाच्या ३९ व्या पदवीदान समारंभात बोलत होते.

समारंभाच्या अध्यक्षस्थानी राज्यपाल जिष्णू देव वर्मा होते. त्यांच्या हस्ते मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांना, मानद डॉक्टर ऑफ सायन्स ही पदवी देवून सन्मानित करण्यात आलं. कृषी विद्यापीठाच्या स्नातकांनी, संशोधन, तंत्रज्ञान, नवोन्मेष आणि यावर भर द्यावा, असं आवाहन राज्यपालांनी केलं.

एकूण 4 हजार 602 स्नातकांना या सोहळ्यात पदवी, पदव्युत्तर पदवी, आणि आचार्य पदवीनं गौरवण्यात आलं.

**<><><><>**

केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळ सीबीएसई ने पश्चिम आशिया भागात उद्यापासून सुरु होणारी बारावीची परीक्षा रद्द केली आहे. याआधी १ मार्च ते ९ मार्चदरम्यान होणाऱ्या परीक्षा पुढे ढकलल्या होत्या, परंतु त्याही आता रद्द केल्याची घोषणा सीबीएसई ने केली आहे. पश्चिम आशिया भागातल्या बारावीच्या विद्यार्थ्यांचे

निकाल घोषित करण्याच्या प्रक्रियेबद्दल पुढील काळात माहिती देण्यात येईल असं मंडळानं म्हटलं आहे.

<><><><><>

पद्म पुरस्कार २०२७ साठी सरकारने पात्र उमेदवारांकडून आवेदन आणि जनतेकडून नामांकनं मागवली आहेत. केंद्रीय गृहमंत्रालयाने एका पत्रकाद्वारे ही माहिती दिली. ही नामांकनं आणि आवेदन राष्ट्रीय पुरस्कार पोर्टलवर ऑनलाईन दाखल करता येतील. यासाठी ३१ जुलै पर्यंत मुदत देण्यात आली असून पुरस्कारांची घोषणा पुढच्या वर्षीच्या प्रजासत्ताक दिनाला केली जाईल.

<><><><><>

गंगा नदीच्या काठावर झालेल्या बेकायदेशीर बांधकामांची माहिती, तसंच यावर काय कारवाई केली याचा सविस्तर अहवाल देण्याचे निर्देश सर्वोच्च न्यायालयानं केंद्र सरकारला दिले आहेत. गंगेचं पुनरूज्जीवन, संरक्षण आणि व्यवस्थापन करण्यासाठी काय पावलं उचलली याची माहिती सादर करायला न्यायाधीश न्यायमूर्ती जे बी पारडीवाला आणि न्यायमूर्ती के व्ही विश्वनाथन यांच्या खंडपीठानं केंद्र सरकारला सांगितलं आहे. गंगेच्या खोऱ्यातल्या राज्यांनी याबाबत सखोल परीक्षण करावं असे निर्देश न्यायालयानं दिले आहेत.
या प्रकरणी पुढची सुनावणी २३ एप्रिलला होणार आहे.

<><><><><>

रशियाची राजधानी मॉस्कोकडे येणारे युक्रेनचे २८ ड्रोन्स रशियाच्या संरक्षण प्रणालीनं अडवून नष्ट केले आहेत. मॉस्कोचे महापौर सर्जी सोब्यानीन यांनी आपल्या समाजमाध्यमावरच्या संदेशात ही माहिती दिली आहे. यामुळे जीवितहानी अथवा वित्तहानी झाल्याचा उल्लेख मात्र या संदेशात केलेला नाही.

//<><><><><>//